जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी
राष्ट्रीय आरोग्य अभियान
जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी अखत्यारित निव्वळ कंत्राटी स्वरुपातील ११ महीन्याच्या करार तत्वावर खालील कार्यक्रमांतर्गत रिक्त असणा-या पदासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ) विशेष नवजात शिशु काळजी कक्ष (एसएनसीयु विभाग) :-

अ. क्र.	पदाचे नाव	रिक्त पदांची वर्गवारी									
		अ जा	अज	विजा	भ. ज.ब	भ.ज. क	भ.ज. ड	वि.मा. प्र.	इमाव	खुले	एकूण
१.	वैदयकिय अधिकारी (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.४००००/-)	१	०	०	०	०	०	०	०	२	३
२.	अधिपरिचारीका (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.१५०००/-)	२	१	०	०	१	०	०	०	२	६
३.	इनचार्ज सिस्टर (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.१६०००/-)	०	०	०	०	०	०	०	०	१	१

ब) पोषन पुनर्वसन केंद्र (एनआरसी विभाग) :-

अ. क्र.	पदाचे नाव	रिक्त पदांची वर्गवारी									
		अ जा	अज	विजा	भ. ज.ब	भ.ज. क	भ.ज. ड	वि.मा. प्र.	इमाव	खुले	एकूण
१.	वैदयकिय अधिकारी (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.४२०००/-)	०	०	०	०	०	०	०	०	१	१
२.	स्त्री आहारतज्ञ (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.१६०००/-)	०	०	०	०	०	०	०	०	१	१
३.	अधिपरिचारीका (एकत्रित एकूण मासिक मानधन जीएनएमसाठी रु. १२०००/- व एएनएम रु. ९०००/-)	१	०	०	०	०	०	०	०	१	२

क) नवजात शिशु स्थिरता कक्ष (एनबीएसयु विभाग) :-

अ. क्र.	पदाचे नाव	रिक्त पदांची वर्गवारी									
		अ जा	अज	विजा	भ. ज.ब	भ.ज. क	भ.ज. ड	वि.मा. प्र.	इमाव	खुले	एकूण
१.	अधिपरिचारीका (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.१२०००/-)	१	१	१				०	०	३	६

वरील एनबीएसयु अधिपरिचारिकाची पदे खालील रुग्णालयामध्ये भरावयाची आहेत.

अ) उपजिल्हा रुग्णालय, दापोली - २

ब) उपजिल्हा रुग्णालय, कामथे - २

क) ग्रामीण रुग्णालय, राजापूर - २

उपरोक्त पदांच्या अनुक्रमानुसार आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे,

<u>विशेष नवजात शिशु काळजी कक्ष (एसएनसीयु विभाग)</u>

१) वैदयकिय अधिकारी (एसएनसीयु) :-

अ) किमान पात्रता एम.बी.बी.एस

ब) डी.सी.एच/एम.डी असल्यास प्राधान्य

क) वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत

ड) नवजात अर्भक कक्षात कामाच्या अनुभवास प्राधान्य

इ) नवजात अर्भक काळजी कक्षात किमान रोज ८ तास शिफट डयुटीमध्ये काम करावे लागेल, आपतकालीन दाखल होणाऱ्या नवजात अर्भकांना तपासणी करुन उपचार करणे, एसएनसीयुमधील अर्भकांचा नियमीत राऊंड घेणे आवश्यक राहील.

फ) पदांचा कालावधी अकरा (११) महीन्याचा असेल.

ग) संगणकाबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य

म) एसएनसीयु दैनंदिन अहवाल बालरोगतज्ञांस ऑनलाईन पध्दतीने सादर करणे.

२) अधिपरिचारीका (एसएनसीयु) :-

अ) किमान गुणवत्ता जी.एन.एम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावा.

ब) पदाचा कालावधी अकरा (११) महीन्याचा असेल.

क) वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत

ड) नवजात अर्भक कक्षात कामाच्या अनुभवास प्राधान्य

इ) विशेष नवजात अर्भक काळजी कक्षात बाळांची काळजी घेणे, कक्षातील फाईल किपींग रेकॉर्ड व रजिस्टर अदययावत ठेवणे.

ग) संगणकाबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य

३) इनचार्ज सिस्टर (एसएनसीयु) :-

अ) किमान गुणवत्ता जी.एन.एम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावा.

ब) पदाचा कालावधी अकरा (११) महीन्याचा असेल.

क) वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत

ड) नवजात अर्भक कक्षात कामाच्या अनुभवास प्राधान्य

ग) संगणकाबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य

<u>पोषन पुनर्वसन केंद्र (एनआरसी विभाग) :-</u>

१) वैदयकिय अधिकारी (एनआरसी) :-

अ) किमान पात्रता एम.बी.बी.एस

ब) सॅम बालकांना पोषन पुनर्वसन केंद्रात उपचार देण्याचे प्रशिक्षण घेतलेला असावा.

२) स्त्री आहारतज्ञ (एनआरसी)

अ) M.sc/B.sc Food & Nutrition किंवा M.sc/B.sc Home Science किंवा Diploma in Dietetics असणे गरजेचे आहे. तसेच M.sc/B.sc Food & Nutrition यांना जास्त प्राधान्य देण्यात येईल.

ब) संगणकाबाबतचे ज्ञान आवश्यक

३) अधिपरिचारीका (एनआरसी) :-

अ) किमान गुणवत्ता एएनएम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावे, जी.एन.एम कोर्स झालेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

ब) संगणकाबाबतचे ज्ञान आवश्यक

<u>नवजात शिशु काळजी कक्ष (एनबीएसयु विभाग) :-</u>

१) अधिपरिचारीका (एनबीएसयु) :-

अ) किमान गुणवत्ता जी.एन.एम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावा.

ब) पदाचा कालावधी अकरा (११) महीन्याचा असेल.

क) वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत

ड) नवजात अर्भक कक्षात कामाच्या अनुभवास प्राधान्य

इ) विशेष नवजात अर्भक काळजी कक्षात बाळांची काळजी घेणे, कक्षातील फाईल किपींग रेकॉर्ड व रजिस्टर अदययावत ठेवणे.

ग) संगणकाबाबतचे ज्ञान असल्यास प्राधान्य

१) सुचना :

१) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) सदरची भरती प्रक्रिया स्थगित करणे अथवा पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवेलेले आहेत.

३) वरील पदांना कोणतेही इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

४) निवड झालेल्या उमेदवाराला प्रथम दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत नेमणुक दिली जाईल.

५) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडीनंतर १ वर्ष कालावधी करीता प्रतिक्षा यादी ग्राहय धरण्यात येईल.

६) निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील व १००/- रुपयाचे करारपत्रक सादर करावे लागेल.

७) जाहीरातीत नमुद पदे व पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

८) वरीलप्रमाणे रिक्त जागी उमेदवार निवड केलेनंतर गुणानुक्रमे येणारे यांचे जिल्हा रत्नागिरी करिता प्रतिक्षा यादी तयार केली जाईल.

<u>विशेष सूचना :-</u>

१) सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) सदर जाहिरातीतील उल्लेख केलेली वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अटी संबंधित पदासाठी आवश्यक असलेली पात्रता दर्शवितात.

३) विहित नमुन्यानुसार / निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा आधिकार स्वतःकडे राखुन ठेवला असुन या संदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही. पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्यावर शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

४) पदभरतीची प्रक्रीया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीतने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

५) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

२) अर्जासोबत शुल्क (फी) :-

अ.क्र.	पदाचे नाव	खुला प्रवर्ग	राखीव प्रवर्ग
१.	वैदयकिय अधिकारी (एसएनसीयु)	२००/- (अधिक बॅंक चार्जेस)	१००/- (अधिक बॅंक चार्जेस)
२.	वैदयकिय अधिकारी (एनआरसी)		
३.	अधिपरिचारीका (एसएनसीयु)		
४.	अधिपरिचारीका (एनआरसी)		
५.	आहारतज्ञ		

वर दर्शविण्यात आलेले परिक्षा शुल्क हे बॅंक प्रोसेसींग चार्जेस वगळून आहे. सदर परिक्षा शुल्क हे स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत चलनाद्वारे किंवा ऑनलाईन बॅंकीग सुविधाद्वारे (उदा.डेबीट कार्ड, नेट बॅंकींग) संकेतस्थळावर दिलेल्या सुचनानुसार भरणे आवश्यक आहे. सदर परिक्षा शुल्काची रक्कम ना परतावा असेल.

३) अर्ज करण्याची पध्दत :-

१) प्रस्तुत पदांकरीता फक्त ऑनलाईन पदधतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. एका पेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास स्वतंत्र पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावे लागेल.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज http://rtnnrhm.in या लिंकवर सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर लिक www.ratnagiri.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चूकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना अध्यक्ष, निवड समिती, रत्नागिरी हे जबाबदार असणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी असणे बंधनकारक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी नोंदविणे बंधनकारक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वतःचा अद्ययावत विहित पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन http://rtnnrhm.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करताना फोटोची २० केबी व सहीची साईज २० केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे.

६) उमेदवारांना मुलाखतीसाठी त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता आमंत्रीत केली जाणार असल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सूचना http://rtnnrhm.in व www.ratnagiri.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवारांनी http://rtnnrhm.in या संकेतस्थळावर अर्ज भरणेबाबतची माहीती व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क जमा केले म्हणजे मुलाखतीसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यात येऊ नये. उमेदवाराने अर्जाची प्रिंट व परीक्षा शुल्क भरल्याची प्रत कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर अर्जाची व परीक्षा शुल्क भरल्याची प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत.

८) उमेदवाराने स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरलेनंतर त्याची स्थिती http://rtnnrhm.in या संकेतस्थळावर पहाता येऊ शकेल.

९) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती/ मुलाखतीचे वेळापत्रक/मुलाखतीचे ठिकाण इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६) मुलाखतीचे स्वरुप :-

१) वैदयकिय अधिकारी :- एसएनसीयु/एनआरसी

सदर पदांकरीता पात्र उमेदवाराची थेट मुलाखतद्वारे निवड करण्यात येईल. सदर मुलाखतीबाबतच्या सुचना प्रस्तुत जाहीरातीत नमुद करण्यात आलेले आहे.

२) आहारतज्ञ :- सदर पदांकरीता पात्र उमेदवाराची थेट मुलाखतद्वारे निवड करण्यात येईल. सदर मुलाखतीबाबतच्या सुचना प्रस्तुत जाहीरातीत नमुद करण्यात आलेले आहे.

३) इनचार्ज सिस्टर/अधिपरिचारीका :- एसएनसीयु/एनआरसी/एनबीएसयु

सदर पदांकरीता अर्ज छानणी अंती मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची कौशल्य चाचणी व प्रात्यक्षीक चाचणी तसेच मुलाखतद्वारे निवड करण्यात येईल. सदर मुलाखतीबाबतच्या सुचना प्रस्तुत जाहीरातीत नमुद करण्यात आलेले आहे.

वैदयकिय अधिकारी व आहारतज्ञ संवर्गातील ऑनलाईन भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

अ.क्र.	भरती प्रक्रिया कार्यक्रम	संभावित दिनांक
१.	बॅकेत विहीत चलनाद्वारे शुल्क भरण्याचा व अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी	०६.०९.२०१६ ते २०.०९.२०१६ रात्रौ.११.५५ पर्यंत
२.	मुलाखतीसाठी पात्र/अपात्र यादी प्रसिध्द दिनांक	दिनांक २६.०९.२०१६
३.	अपात्र उमेदवारांचे लेखी आक्षेप स्विकारण्याचा कालावधी	दिनांक २६.०९.२०१६ ते २८.०९.२०१६ कार्यालयीन वेळेपर्यंत
४.	मुलाखतीसाठी पात्र अंतिम यादी प्रसिध्द दिनांक	दिनांक २९.०९.२०१६
५.	मुलाखतीबाबतचा तसेच भरतीप्रक्रियेचा पुढील कार्यक्रम प्रसिध्द दिनांक	दिनांक ०६.१०.२०१६

अधिपरिचारीका/इनचार्ज सिस्टर संवर्गातील ऑनलाईन भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

अ.क्र.	भरती प्रक्रिया कार्यक्रम	संभावित दिनांक
१.	बॅकेत विहीत चलनाद्वारे शुल्क भरण्याचा व अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी	०६.०९.२०१६ ते २०.०९.२०१६ रात्रौ.११.५५ पर्यंत
२.	मुलाखतीसाठी पात्र/अपात्र यादी प्रसिध्द दिनांक	दिनांक २६.०९.२०१६
३.	अपात्र उमेदवारांचे लेखी आक्षेप स्विकारण्याचा कालावधी	दिनांक २६.०९.२०१६ ते २८.०९.२०१६ कार्यालयीन वेळेपर्यंत

४.	मुलाखतीसाठी पात्र अंतिम यादी प्रसिध्द दिनांक	दिनांक २९.०९.२०१६
५.	मुलाखतीबाबतचा तसेच भरतीप्रक्रियेचा पुढील कार्यक्रम प्रसिध्द दिनांक	दिनांक ०६.१०.२०१६

मुलाखतीसाठी अपात्र उमेदवारांनी त्यांचे आक्षेप उपरोक्त दिलेल्या मुदतीत जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी यांचे कार्यालयास सुट्टीचे दिवस वगळून लेखी सादर करु शकतात अथवा cs_ratnagiri@rediffmail.com किंवा cs.ratnaggiri@gmail.com या ईमेल आयडीवर कार्यालयीन वेळेत मेल करु शकता. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे :-

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला.
३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो ५) जात प्रमाणपत्राची सांक्षाकिंत प्रत
६) नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सन २०१६-१७ करीता वैध असणारे
७) जात वैधता प्रमाणपत्र
८) वय/अधिवास/राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र

उपरोक्त प्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या मुळ प्रमाणपत्रांसोबत साक्षांकित केलेल्याची एक प्रत आणणे आवश्यक आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा शासकिय रुग्णालय रत्नागिरी.

ठिकाण : रत्नागिरी
दिनांक : ०३.०९.२०१६